Prof. Dr. Shriniwas Hemade, madshri@otmail.com, 09226563052, http://shriniwashemade.yolasite.com/




# Unit 6

## Ethics (Western)

## नीतिमीमांसा (पाश्चात्य)

----------------------------------------------------------------

**अभ्यासक्रम**




1. मूलभूत नैतिक संकल्पना :
   शिव, हक्क, कर्तव्य आणि बंधकता
2. नैतिकतेचे सिध्दान्त :
   अ) प्रयोजनवादी सिध्दान्त :
   1. सुखवाद
   2. अहंकेंद्रवाद
   3. सार्वत्रिक सुखवाद

   ब) कर्तव्यवादी सिध्दान्त :
   1. काण्टचा निरुपाधिक आदेश

प्रस्तावना :

नीतिशास्त्र ही तत्वज्ञानाची एक शाखा आहे, असे परंपरेने मानण्यात आले आहे आणि तत्वज्ञानाच्या इतर शाखांप्रमाणेच, नीतिशास्त्राचे स्वरूप आणि प्रयोजन ह्यांविषयी, ह्यांविषयी तत्ववेत्त्यांमध्ये मूलभूत मतभेद आहेत. म्हणजे नीतिशास्त्र कशाचे ज्ञान प्राप्त करून देते, कोणत्या प्रकारचे ज्ञान प्राप्त करून देते आणि ह्या ज्ञानाचे प्रामाण्य ते कोणत्या पद्धतीने सिद्ध करते, ह्यांविषयी हे मतभेद आहेत.

पाश्चात्य परंपरेतील अभिजात तत्ववेत्ते उदा., प्लेटो, ॲरिस्टॉटल, एपिक्यूरस, हॉब्ज, स्पिनोझा, बटलर, कांट, जॉन स्ट्यूअर्ट मिल इ. यांनी माणसाने कसे जगावे, कोणत्या प्रकारची कृत्ये करावीत, कोणती साध्ये प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करावा, त्याचे इतरांशी संबंध कसे असावेत, ह्यांविषयीची सत्ये कोणती हे सांगण्याचा प्रयत्न केला. म्हणजे माणसाचे कल्याण कशात असते, माणसाची कर्तव्ये काय आहेत, माणसाचे कल्याण आणि त्याची कर्तव्ये ह्यांच्यातील परस्परसंबंधाचे स्वरूप काय ? , ह्याचे ज्ञान आपल्याला करून देणे हे नीतिशास्त्राचे प्रयोजन आहे असे ते मानतात आणि हे सारे ज्ञान अर्थात व्यावहारिक ज्ञान आहे.

व्यवहाराचे मार्गदर्शन, नियमन करणे हे ह्या ज्ञानाचे एक मध्यवर्ती प्रयोजन आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या आकृतींच्या स्वरूपाचे ज्ञान भूमिती प्राप्त करून घेते, भौतिक घटना कोणत्या नियमांना अनुसरून घडतात हे शोधून काढायचा भौतिकीचा प्रयत्न असतो. जे आहे त्याचे स्वरूप काय आहे एवढेच ही शास्त्रे सांगतात. नीतिशास्त्र, चांगल्या जीवनाचे स्वरूप कसे असते हे सांगताना, माणसाने कशा प्रकारे जगावे, त्याने काय साधावे, काय करावे हे सांगत असते. "व्यवहाराचे मार्गदर्शन, नियमन करणे, हे नीतिशास्त्राचे उद्दिष्ट असते" ह्या म्हणण्याचा अर्थ असा नाही, की एखाद्या विशिष्ट माणसाने विशिष्ट प्रसंगी काय करावे ह्याविषयीचा सल्ला देणे, त्याला उपदेश करणे हे नीतिशास्त्रज्ञाचे किंवा नैतिक तत्त्ववेत्त्याचे काम असते. पण ह्या प्रकारचे निर्णय ज्या तत्त्वांना अनुसरून घेतले पाहिजेत ती मूलभूत सामान्य तत्त्वे, ह्या तत्त्वांवर आधारलेली अधिकची विशिष्ट तत्त्वे स्पष्ट करणे आणि ह्या तत्त्वांचे प्रामाण्य सिद्ध करणे हे नीतिशास्त्राचे कार्य आहे. मूलभूत नैतिक तत्त्वांचे प्रामाण्य सिद्ध करताना माणसाचे स्वरूप काय आहे, मानवी प्रकृतीतील मूलभूत प्रेरणा कोणत्या असतात, विश्वात माणसाचे स्थान काय आहे आणि विश्वाशी त्याचा संबंध काय आहे, ह्या प्रश्नांचा विचार करावाच लागतो. एखादा नीतिमान प्रेषित किंवा प्रतिभावंत कवी जीवनाचे मार्गदर्शन करणारा, माणसाच्या नैतिक समस्यांचे मर्म उघड करणारा दृष्टिकोन प्रभावी रीतीने मांडताना अनेकदा आढळतो. पण नीतिशास्त्रज्ञ आपण स्वीकारलेल्या तत्त्वांची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करतो, त्यांचे पद्धतशीर, तार्किक युक्तिवादाचा अवलंब करून समर्थन करण्याचा प्रयत्न करतो आणि ह्यामुळे नीतिशास्त्रज्ञ प्रेषित किंवा कवी यांच्याहून वेगळा ठरतो; प्रेषिताचा संदेश किंवा कवीची नैतिक शिकवण यांपासून नीतिशास्त्राचे स्वरूप वेगळे ठरते.[1]

---

[1] रेगे, मे. पुं., मराठी विश्वकोश, "नीतिशास्त्र", http://www.marathivishwakosh.in/khandas/khand8/index.php

Department Of Philosophy, Sang

## व्युत्पत्ती (Etymology):

आपण असे पाहिले की इंग्रजीत नीतिला Ethics असा शब्द आहे. 'नीतिमीमांसा' हे Ethics चे भाषांतर होय. Ethics ला Moral Philosophy असाही पर्याय असून Ethics हा शब्द प्राचीन ग्रीक भाषेतील ethos या शब्दापासून बनतो. Ethos म्हणजे सामाजिक चालीरिती, सामाजिक सर्वमान्य वर्तन. सर्वमान्य म्हणून चांगले, असे समीकरण त्या काळात असल्यामुळे Ethics म्हणजे ***चांगल्या वर्तनाचे शास्त्र*** अशी व्याख्या बनली. Moras या लॅटिन भाषेतील शब्दापासून morality हा शब्द बनलो. Moral म्हणजे लोकांची समाजातील समान वागण्याची पध्दती .त्यामुळे सर्व माणसाच्या समान वागण्याच्या नीतिनियमांना moral असे म्हणतात. Ethics, Morality, Moral Philosophy, नीतिमीमांसा हे सर्व शब्द परस्परांचे पर्याय किंवा भाषांतर म्हणून वापरले जातात.

सर्व व्युत्पत्ती ***'चांगले वर्तन'*** या संकल्पनेवर भर देतात .त्यामुळेच त्यांच्यापासून बनणारे सर्व शब्द नैतिकताच स्पष्ट करतात. अशा तऱ्हेने नीतिशास्त्र 'चांगले' (Good) या संकल्पनेची चर्चा करते. ***चांगले म्हणजे काय ?*** हा नैतिक प्रश्न आहे. त्या आधारेच खरी तर नैतिक चर्चा होते.

या प्रकरणात आपण पाश्चात्य नीतिशास्त्रात ज्या मूलभूत नैतिक संकल्पनांवर चिंतन झाले त्याची माहिती घेणार आहोत. तसेच काही नीतिशास्त्रीय सिद्धान्ताचा परिचय करुन घेणार आहोत.

## 2. मूलभूत नैतिक संकल्पना : शिव,हक्क,कर्तव्य आणि बंधकता

नीतिशास्त्र नैतिक वर्तनाचे विश्लेषण करते, सदाचरण, कर्तव्य,चांगुलपणा,दुरित, पाप इ. नैतिक संकल्पनांचा दैनंदिन व्यवहारातील वापर,त्यांचे स्वरुप,त्याचा अर्थ या सगळयांची चिकित्सा करणारे नीतिशास्त्र हे एक व्यावहारिकक शास्त्र आहे. कोणत्याही नैतिक-अनैतिक वर्तनामागे काही मूलभूत संकल्पना असतात. त्यापुढील प्रमाणे -

1. शिव
2. हक्क
3. कर्तव्य
4. बंधकता

### (1) शिव :

शिव -'चांगले'(Good) ही मुख्य नैतिक संकल्पना आहे. चांगले म्हणजे काय ? हा एक नीतिशास्त्रीय प्रश्न आहे. चांगुलपणाचे ज्ञान झाले की व्यक्ती निश्चितरित्या चांगली वागते का ? की ज्ञान नसतानाही चांगली वागते ? की चांगुलपणाचे ज्ञान नसतानाच ती चांगली वागते ? 'चांगले काय ?' हे कळून देखील एखादी व्यक्ती वाईट का वागत असते ? अशा व्यक्तीला खरेच चांगले म्हणजे काय ? हे नक्की कळाले आहे, असे म्हणता येते का? चांगल्या वाईटातून मी चांगल्याची निवड का करावी ?

हे सर्व प्रश्न अत्यंत गंभीर गुंतागुंतीचे आणि थेट प्रश्न आहेत. दैंनदिन जीवन जगतांना आपल्याला हे प्रश्न पडतात. पण या प्रश्नांची आपण कधीही गंभीर चर्चा करीत नाही. त्यामुळे ते बाजूला टाकले जातात आणि गृहीत धरले जातात. आणि त्यानंतर चांगल्या वाईटाचा सतत गोंधळ होऊन आपले व्यक्तिगत व सार्वजनिक जीवन गुंतागुंतीचे बनते. म्हणून या सर्व प्रश्नांची चर्चा आवश्यक आहे.

'चांगले' हे पद नैतिक अर्थाने घेतल्यास त्यासंबंधात चार तात्त्विक प्रश्न उपस्थित होतात. ते असे :

1. 'चांगले' या पदाने नेमका कशाचा निर्देश होतो ?
2. कोणत्या गोष्टी चांगल्या आहेत ? आणि आपण त्या कशा ओळखतो ?
3. सर्वोच्च चांगले (अंतिम शिव - **Highest or Complete Good**) कोणते ?

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

4. चांगुलपणा म्हणजे नेमके ठरवावे कसे ? जगातील इतर प्रकारच्या चांगुलपणाशी नैतिक चांगुलपणा कसा ताडून पाहावा ?

**मूरची पध्दती**

चांगले किंवा शिव या संकल्पनेची चर्चा ग्रीक-पाश्चात्य तत्त्वज्ञांनात हजारो वर्षे चालू आहे.ज्ञान हाच सद्‌गुण असा दावा सॉक्रेटीस करतो.तर प्लेटोने धैर्य, संयम, न्याय, दूरदर्शीपणा यांना सदगुण म्हंटले आहे.काण्टने कर्तव्यबुद्‌धिला चांगले म्हटले आहे. एकोणिसाव्या-विसाव्या शतकात जॉर्ज एडवर्ड मूर या ब्रिटीश तत्त्ववेत्त्याने 'शिव' पदाचे आधुनिक विश्लेषण दिले.त्यासाठी मूरने स्वतंत्र विश्लेषण पध्दती विकसित केली.तिला **मूरची पध्दती** म्हणतात.



**George Edward Moore**
(4 November 1873 –
24 October 1958)
An English philosopher



शिव ही संकल्पना गूढ, अतींद्रिय व अनाकलनीय आहे, असे समजले जाते. पण हा गैरसमज आहे, असे मूर म्हणतो. उलट त्याच्या मते 'शिव' ही साधी, सरल संकल्पना आहे आणि ती ज्ञानेंद्रीयांना कळणारी नाही तर बुद्‌धिला कळणारी आहे.''प्रिन्सिपिया एथिका (Principia Ethica 1903) या ग्रंथात मूर हा विचार मांडतो. तो म्हणतो, '' 'चांगले आचरण' ही मिश्र संकल्पना आहे. कारण जे चांगले नाही, असे आचरण असू शकते आणि आचरणाशिवाय इतर गोष्टीही चांगल्या असू शकतात.'' म्हणून चांगले आचरण व इतर चांगल्या गोष्टी यांना समान असणारे 'चांगले' म्हणजे काय? ते ठरविले पाहिजे. मूरच्या मते, दोन प्रश्न नीतिशास्त्रात महत्वाचे असतात.

1) कोणत्या गोष्टी स्वतःहून चांगल्या असतात ?
2) अशा चांगल्या गोष्टी प्रत्यक्षात अस्तित्वात याव्यात, यासाठी आपण कोणत्या कृती करावयास हव्यात ?

यातील पहिल्या प्रश्नाच्या उत्तरावर दुसरा प्रश्न अवलंबून आहे. पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना मूर त्याची शिवविषयक संकल्पना मांडतो. त्याच्या मते, शिव या संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते वैशिष्ट्य असे की शिव ही साधी,सरल,निरवय आणि म्हणून अव्याख्येय संकल्पना आहे. तिचे ज्ञान माणसाच्या ज्ञानेंद्रीयांना होत नाही तर प्रतिभेला, प्रज्ञेला (Intuition) होते.

शिव अव्याख्येय आहे. तिची व्याख्या देता येत नाही. व्याख्या देण्याचा प्रयत्न केलाच तर काही ना काही दोष उरतोच. एखाद्या संकल्पनेची व्याख्या देणे, याचा अर्थ त्या संकल्पनेचे विश्लेषण देणे असते. विश्लेषण देणे म्हणजे ती संकल्पना अन्य कोणकोणत्या संकल्पनांनी बनलेली आहे, ते स्पष्ट करणे होय. उदाहरणार्थ 'चांगला घोडा' म्हणजे तगडा, भरघोस आयाळ असणारा, भरधाव पळणारा, शर्यत जिंकणारा, अशी व्याख्या केली जाते. तगडेपणा, वेगात पळणे, जिंकणे या घोड्यापेक्षा वेगळ्या संकल्पना आहेत. त्या इतर प्राण्यासही लागू करता येतात, पण येथे घोड्याला लागू केल्या आहेत. या संकल्पनांच्या साह्याने 'चांगला घोडा' ही संकल्पना बनते. अशा रितीने 'चांगला घोडा' ही संमिश्र संकल्पना बनते. याचा दुसरा अर्थ असा की 'चांगला घोडा' या संकल्पनेचे विश्लेषण किंवा व्याख्या आपण या इतर संकल्पनांच्या साह्याने करु शकतो. 'चांगला रस्ता', चांगले शासन, चांगला नवरा-चांगली बायको' या व इतर संकल्पनांचे विश्लेषण व व्याख्या अशी करता येते.

पण मूरच्या मते, खुद्द 'चांगले' / 'शिव' ही अशी अनेक संकल्पनांनी बनलेली संमिश्र संकल्पना नाही. चांगले ही साधी सरल संकल्पना आहे.ती कोणत्याही इतर संकल्पनांनी बनलेली नाही, तिचे इतर संकल्पनांच

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

साह्याने व्याख्या करता येत नाही. म्हणून ती अविश्लेष्य आणि अव्याख्येय संकल्पना आहे.तिचे ज्ञान थेट मानवी प्रज्ञेलाच होते.चांगुलपणा जिथे असेल तिथे व्यक्तीमध्ये, घटनेमध्ये किंवा एखाद्या संकल्पनेमध्ये- जिथे असेल तिथे चांगुलपणाचे प्रातिभज्ञान होते.म्हणूनच एखादा माणूस चांगला की वाईट हे आपणास त्याच्या बाह्य वर्तणूकीपेक्षा त्याच्याकडे ***केवळ पाहून*** जास्त लवकर कळते ! त्यामुळे व्याख्येच्या भानगडीत न पडता ती व्यक्ति,वस्तू इत्यादी चांगली आहे की नाही ते सरळ प्रज्ञाबुद्धिलाच विचारणे, योग्य ठरते.

थोडक्यात, मूरच्या मते ***शिव ही साधी,सरल,निरवय, अविश्लेष्य आणि अव्याख्येय संकल्पना आहे.***

## (2) हक्क

हक्क हा इंग्लिशमधील Right या संज्ञेचे भाषांतर होय.हक्काची संकल्पना प्राचीन रोमन कायद्यानुसार आली.तिचा कायद्याशी म्हणजे न्याय संकल्पनेशी संबध जोडला गेला.म्हणूनच ***हक्क म्हणजे जे आपणास न्याय्य रितीने मिळायलाच हवे ते***, अशी व्याख्या करण्यात आली. हक्काचा दावा करताना दोन गोष्टी गृहीत धराव्या लागतात.त्यांना हक्काची लक्षणे म्हणता येईल.

1. हक्काला नैतिक आधार असला पाहिजे.
2. हक्काला समाजमान्यला असली पाहिजे.

नैतिक आधार असणे म्हणजे जी व्यक्ती त्या हक्काचा दावा करते तिला तो मिळणे खरेच देणे योग्य आहे, असे वाटणे.उदा.बेकाराला काम मिळणे.या नैतिकतेला कायदेशीर मान्यता मिळाली की त्याचेच रुपांतर कायदेशीर हक्कात होते.हक्क कायदेशीर झाला की तो सक्तिने मिळतोच.पण इथे एक अडचण आहे : नैतिक हक्काला कायदेशीरता मिळणे, हे जरी बरोबर वाटले तरी प्रत्येक नैतिक हक्काला कायदेशीरता मिळेलच असे नसते. शिवाय प्रत्येक कायदेशीर हक्क जरी कायदेशीर असला तरी तो नैतिक असेलच असे नाही.

हक्काची समाज मान्यता म्हणजे हक्काला नैतिक पाठबळ मिळणे.समाजाकडून मिळणारे, मान्य असलेले हक्क मिळणे ही कायदेशीर हक्कात भर घालणारी गोष्ट असते.समाजाला मान्य नसलेला पण कायदामान्य हक्क मिळाला तरी समाज बहिष्कार घालून आपला निषेध नोंदवितो.अशी व्यक्ती असहकारामुळे असहाय्य बनते. कारण हक्क बजाविण्यासाठी सुध्दा समाजाचीच गरज असते. त्यामुळे हक्क कोणताही असला तरी समाजमान्यता ही अनिवार्य अट असते.

## हक्काचे चार प्रकार

### (1) नैतिक हक्क :

व्यक्तीला नैतिकदृष्ट्या हक्क मिळणे समर्थनीय असणे म्हणजे नैतिक हक्क होय.अर्थात कायदेमान्यता व समाजमान्यता त्या हक्काला असणे आवश्यक असतेच.उदाहरणार्थ राखीव जागांचे धोरण स्त्रीशिक्षण, स्वातंत्र्य, समता इत्यादी.

### (2) कायदेशीर हक्क :

घटनेनुसार मिळणारे हक्क म्हणजे कायदेशीर हक्क होय.दंडशक्ती व न्यायशक्ती या कायद्याच्या दोन यंत्रणांद्वारे कोणत्याही व्यक्तीला हे हक्क मिळतात.अर्थातच ही लोकशाहीतील बाब म्हणावी लागेल.पण कधी कधी कायदाच इतका ताठर असतो की नैतिक हक्क मिळविण्यासाठी व्यक्ती / समूहाला कायद्याशीच संघर्ष करावा लागतो.उदा.महिला विधेयक.काहीवेळेस तर इतक्या चमत्कारीक घटना घडतात की कायदाच अनैतिक आहे की काय , असे वाटू लागते.काही समाजकंटकांमुळे कायदा व न्याययंत्रणांचा अपकिर्ती होते.त्या बदनाम होता.कायद्यात त्रुटी असतात.पण लोकमताच्या आधारे त्यात बदल करता येतो.ही घटनादुरुस्ती होय.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

**(3) नैसर्गिक हक्कः**

व्यक्तीला जन्मतःच मिळणारे हक्क म्हणजे नैसर्गिक हक्क होय.मग ते तिला माहित असो वा नसो.जन्म जितका नैसर्गिक तितकेच हक्कही नैसर्गिक असतात.उदा.जगण्याचा हक्क.जॉन लॉक या ब्रिटीश तत्त्वज्ञाच्या मते काहीही करून आपले अस्तित्व टिकविणे हा नैसर्गिक हक्क होय.मूल जन्माला आले की त्याचा हा हक्क त्याला बजावू देणे ही इतरांची जबाबदारी असते . कारण त्यांच्या लहानपणी त्या कालातील मोठ्यांनी ती पार पाडलेली असते म्हणूनच ते जिवंत असतात.त्यामुळे बालकांची जिवीत रक्षा, त्यांच्या जगण्याचा हक्क इतरांनी त्यांना मिळवून दिलाच पाहिजे.अस्तित्व टिकविण्यासाठी इतरांचे हल्ले, आक्रमणे स्वीकारून प्रसंगी आक्रमकालाच नष्ट करणे हा नैतिक व नैसर्गिक हक्क आहे, असे लॉक म्हणतो.



**(4) मूलभूत हक्क :**

अस्तित्वाचा हक्क बजावल्यानंतर व्यक्ती ज्या जीवनपध्दतीत जगते ती पध्दती तिला अन्य काही हक्क देते.आपली लोकशाही पध्दती आहे.ती आपणास पुढील मूलभूत हक्क देते.

1) **जगण्याचा हक्कः** लोकशाहीसह हूकुमशाही ,लष्करशाही इ.कोणत्याही जीवनपध्दतीतीतील हक्क.
2) **स्वातंत्र्याचा हक्कः** सर्वसामान्यांना हा हक्क फक्त लोकशाहीतच मिळतो.अन्य जीवनपध्दतीत तो नसतो.
3) **करार करण्याचा हक्कः** व्यक्ती, समाज यांना केवळ लोकशाहीतच मिळतो.
4) **शिक्षणाचा हक्कः** हा ही लोकशाहीतच मिळणारा हक्क आहे. प्राथमिक सक्तीचे, इतर व्यक्तीवर अवलंबून!

**(5) मानवी हक्क :**

मानवी हक्क ही गेल्या काही वर्षात, विशेषतः दुसऱ्या महायुध्दानंतर रुजलेली नवी संकल्पना असून मानवी अत्याचारांचे जे भीषण अनुभव जगाने घेतले त्यातून ही संकल्पना उदयास आली.मानवी हक्कांची सैध्दांन्तिक मांडणी सर्व प्रथम जॉन लॉक या ब्रिटीश तत्त्ववेत्त्याने केली.''सर्व माणसे जन्मतःच स्वतंत्र व समान असून प्रत्येकाला सारखाच सन्मान आहे. परस्परांशी वर्तन करताना प्रत्येक माणसाने सदसद्विवेकबुध्दिचा अवलंब करावा'' असे युनोच्या जाहीरनाम्यात म्हंटले आहे. '**सदसद्विवेकबुध्दि**' हा शब्द गांधीजींचा असून महात्मा गांधींनी म्हंटले होते की 'सर्व न्यायालयांच्या पलिकडे एक न्यायालय आहे व ते आहे सदसद्विवेकबुध्दिचे.

दुसऱ्या महायुध्दानंतर आकारास आलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेकडे (युनो) मानवी हक्कांविषयीची जबाबदारी आली. आजही युनोकडेच ती असून जगभरात कोठेही मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास युनोत त्याची चर्चा होते. मानवी हक्कांसाठी युनोची स्वतंत्र समिती असून तिची नुकतीच फेररचना झाली.या फेररचनेस अमेरिकेचा आक्षेप होता.त्यासंबंधात जगातच 'मानवी हक्क आयोग 'स्थापन करण्यात आला आहे. मानवाला असलेला मूलभूत हक्क म्हणजे जगण्याचा हक्क हाच मानवी हक्क समजला जातो.सामाजिक सुरक्षा हा या नव्या संकल्पनेचा गाभा असून व्यक्तीला आर्थिक ,राजकीय , सामाजिक इत्यादी हक्क असणे , ही मानव म्हणून नैसर्गिकच बाब आहे, असे मानवी हक्क सांगतो.

**(3) कर्तव्य** (हक्क आणि कर्तव्य यांचा संबंध)

कर्तव्य हे इंग्लीशमधील **Duty** चे भाषांतर होय.हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे म्हटले जाते. या संकल्पना स्वतंत्र वेगळया आहेत पण त्या एकमेकांवर अवलंबून आहेत. एकीचा विचार दुसऱ्या शिवाय करता येत नाही. त्यांच्यात फरक करता येतो. पण त्या वेगळे करता येत नाही. हक्क बजावणे म्हणजेच कर्तव्य करणे आणि कर्तव्य करणे म्हणजेच हक्क बजावणे .सोप्या भाषेत एकाचा हक्क ते दुसऱ्याचे कर्तव्य असते.

''मला स्वातंत्र्याचा हक्क आहे, तो इतरांनी मला बजावू दिला पाहिजे '', अशी अपेक्षा आपण करतो. त्यावेळी इतरांनी ''माझ्या स्वातंत्र्यावर आक्रमण करु नये '' अशी अपेक्षा असते. अतिक्रमण न करणे हे त्यांचे

Department Of Philosophy Sangamner College Sangamner

कर्तव्य बनते. आता "इतरांनी माझ्या संदर्भात मला हक्क बजावून देण्यासाठी कर्तव्य केले पाहिजे हे जसे आपण लक्षात ठेवतो तसे इतरांनाही हक्क आहे व ते त्यानंतर बजावण्याची संधी मिळावी म्हणून मी माझे कर्तव्य केले पाहिजे." थोडक्यात माझ्या हक्कासाठी इतरांचे कर्तव्य आणि त्यांच्या हक्कासाठी माझे कर्तव्य असे त्याचे स्वरुप बनते.

पण समजा व्यक्ती केवळ स्वतःचा हक्क बजावत असेल आणि त्याच वेळेस इतरांना मात्र स्वतःच्या हक्कांवर अतिक्रमण करु देत नाही पण कर्तव्याबाबत उदासीन असेल तर ती इतरांच्या हक्कावर अतिक्रमण करीत आहे,असा अर्थ होतो.ही हुकूमशाही होते.प्रत्येकाने आपले कर्तव्य केल्यास प्रत्येकाला हक्कांचे स्वातंत्र्य मिळते अन्यथा नाही. हक्क उपभोगणे याचाच अर्थ कर्तव्य करण्याची जबाबदारी ठेवणे.



आता 'कर्तव्य कर' असे म्हणण्याची वेळ आपण इतरांना आणू देता कामा नये. 'हक्क आणि कर्तव्य यांचे परस्परावलंबीत्व लक्षात घेता' हक्कांची निर्मिती म्हणजेच कर्तव्यांची निर्मिती ' असा त्याचा अर्थ होतो. केवळ कर्तव्य करणे आणि हक्क न बजावणे हे सुध्दा चुकीचे आहे. एकाची निर्मिती ही दुसऱ्याची निर्मिती असलीच पाहिजे तरच त्या नाण्याच्या बाजू होतील. केवळ हक्क पण कर्तव्य नको. असे असेल तर ते नाणे, नाणे जीवनाच्या बााजारात कसे चालणार? नाहीच चालणार!

## (4) **कर्तव्यता** (कर्तव्यतेचे बंधन) (Obligation)

काय करावे ? कसे वागावे ? हे प्रश्न माणसाच्या आयुष्यात नेहमीच येत असतात.जी कृती केलीच पाहिजे, असे ठामपणे वाटते,त्या कृतीत कर्तव्यता असते.त्यानंतर ती कृती प्रत्यक्षात करणे म्हणजे कर्तव्य (Duty) होय.प्रत्यक्ष कृती करण्याची भावना ही कर्तव्यता असते तर ती थेट करणे हे कर्तव्य असते.म्हणून केवळ कर्तव्य करावे, असा विचार करणे हे कर्तव्य नव्हे. कर्तव्य हे विशेषण वर्तनप्रकारालाच लागू करता येते.कर्तव्य हे नैतिक ध्येय असते.त्याची प्रेरणा ती कर्तव्यता होय.उदाहरणार्थ लाच घेवू नये, दिलेले वचन पाळावे, खोटे बोलू नये,प्रत्येकाचा स्वातंत्र्यचा हक्क जपला गेलाच पाहिजे.

इंग्रजीतील duty आणि obligation या शब्दांचे भाषांतर साधारणपणे 'कर्तव्य' असे एकाच शब्दात केले जाते.पण तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून आपण त्यात सूक्ष्मपणे भेद करु शकतो.केला पाहिजे.duty म्हणजे कर्तव्य आणि obligation म्हणजे कर्तव्यता. ही सामान्य नैतिक बंधन अशा स्वरुपाची असते. obligation अनेक असतात.त्यापैकी एक कुठलीतरी प्राप्त परिस्थितीत duty कर्तव्य ठरते.भारतीय परिभाषेत सांगावयाचे तर obligation म्हणजे ऋण आणि duty म्हणजे स्वधर्म असा करता येईल.ऋणे अनेक असतात, पण ती सगळी फेडली जातातच असे नाही .स्वधर्म करणे मात्र बंधनकारकच असते.

एखादी कृती करणे हे कर्तव्य असताना त्याक्षणी मनाला काय वाटते ? काय भावना आहेत ? माझ्या प्रवृत्तीशी ते करणे जुळते का? हे महत्वाचे नसते.मनाचा कल काहीही असला ते कर्तव्य करणे अतिशय आवश्यक आहे,म्हणून करावयाचे असते.अशी बंधकता असणे याचा अर्थ कर्तव्यता असणे होय.

या बंधकतेचा अर्थ काय ? तर बंधकत्वात एक विशिष्ट प्रकारची आवश्यकता असते.जीवनातील आवश्यकता तीन प्रकारची असते.ती अशीः

1. नैसर्गिक आवश्यकताः

निसर्ग नियमानुसार घडणारी कृती नैसर्गिकरित्या आवश्यक असते. उदाहरणार्थ अधांतरी दगड खाली पडतो.निसर्ग नियम बदलता येत नाहीत आणि तोडताही येत नाहीत.

2. नैमित्तिक आवश्यकताः

शासकीय कायदे,रुढी,परंपरा,संकते इत्यादीचे नियम पाळावे लागतात.पण सक्ति नसते.ते बदलता येतात व तोडताही येतात.उदाहरणार्थ वाहतुकीचे नियम, लग्नाची रित.

3. नैतिक आवश्यकताः

Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

खोटे बोलू नये ' अशासारखा नियम नैतिकदृष्ट्या आवश्यक असतो.तो तोडता येतो पण बदलात येत नाही; 'खोटे बोलावे ' असा बदल करता येत नाही.तो तोडता आला तरी त्याचे पालन झालेच पाहिजे, ही आवश्यकता असते.हीच नैतिक आवश्यकता होय.

या आवश्यकतेलाच कर्तव्याचे बंधकत्व म्हणतात. कर्तव्यता तिच्यातूनच येते.काण्टचा निरुपाधिक आदेश अथवा भगवतगीततेतील श्रीकृष्णाचा अर्जुनाचा उपदेश ही कर्तव्यतेची आणि कर्तव्याची ठळक उदाहरणे होत.

**कर्तव्यबुध्दिचा विकृत अर्थ**

कर्तव्यता करण्याची बुध्दि म्हणजे कर्तव्यबुध्दि (Sense of duty) होय.हा खरा अर्थ होय.पण बऱ्याचदा प्रत्यक्ष वर्तन करताना लोक तिचा अर्थ विकृत करतात.कर्तव्य नाईलाजाने करणे,रुक्षपणे करणे किंवा 'झक् मारीत ' करणे म्हणजे ही ती विकृती आहे.अमुक एक कृती विवेकबुध्दिला पटली की ती आपण आनंदाने आणि उत्साहाने करु शकतो.या भावनेने ती कृती करणे म्हणजे कर्तव्यभावना होय.या कर्तव्यभावनेची आवश्यकता तीच कर्तव्यता होय.



## 2. नैतिकतेचे सिध्दान्त :

### अ) प्रयोजनवादी सिध्दान्त :

1.सुखवाद
2.अहंकेंद्रवाद
3.सार्वत्रिक सुखवाद

**प्रस्तावना :**

'' जगी सर्व सुखी असा कोण आहे ? विचारी मना तोच शोधुनी पाहे '', असे म्हणून संत रामदासांनी सुध्दा सुखाचा शोध घेण्याचे सुचविले.सुख म्हणजे काय ? काय मिळविले म्हणजे सुख मिळविले ? ही एक गंभीर समस्या आहे . पण तिचा गंभीरच काय पण उथळ विचार सुध्दा न करता लोक सुखाच्या मागे लागतात, हीच एक गंभीर गोष्ट आहे.बहुदा ज्यापासून सुख प्राप्त होते त्या वस्तूलाच ते सुख समजतात.उदा.' शांत अखंड झोप म्हणजे सुख ' ,असे असताना ' सुंदर मऊ बिछाना म्हणजे सुख ' समजले जाते. पण बिछाना विकत मिळतो झोप नव्हे. सुख हे साध्य व सुख देणारी वस्तू हे साधन असते पण साधनालाच साध्य समजण्याची चूक लोक करतात.

बरे सुखाची प्रत्येकाची कल्पना ही भिन्न असते कोणाला खाण्यापिण्यात, कुणाला नुसत्या गप्पा मारण्यात, काहींना पैशात तर काहींना नुसते ' बसून' राहण्यात सुख वाटते. प्रत्येकाला सुख हवे असते.पण हवेच असते, असेही नाही.उदाहरणार्थ कुंती,तुकाराम दुःखाची मागणी करतात.गौतम बुध्द दुःख नाकारतोच, तसे सुखही नाकारतो.सॉक्रेटीसच्या मते सुखी डुकरापेक्षा दुःखी माणूस बरा वाटतो.सुख हे वस्तुतः एका भावनेला दिले आहे करुणा,प्रेम,तिरस्कार या जशा भावना आहे तशी सुख ही सुध्दा एक भावना आहे पण सुख, समाधान आणि आनंद यातही फरक आहे. या तिन्ही भावनाच आहेत पण सुखाचा दर्जा उच्च असतो तर समाधान आणि आनंद उच्च असतात असे नाही.शिवाय आनंद हा विकृत सुध्दा असू शकतो. म्हणून सुखाची व्याख्या पुढीलप्रमाणे देता येते.

''**विशिष्ट स्वरुपाची व इष्ट इच्छेची पूर्ती करणे म्हणजे सुख**'' पण येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. हवे असणे व इष्ट असणे यात फरक आहे . जे इष्ट असते ते सुख समाधान देतेच, असे नाही.खोकला आला आहे आणि इतरांसाठी गरम कांदाभजी तळली जात आहे.भजी खाणे समाधान येईल पण इष्ट नसेल.म्हणून "जे इष्ट असेल आणि समाधानही देईल त्याला सुख म्हणता येईल'' म्हणून ***इष्ट समाधानाची पूर्ती म्हणजे सुख*** भावना अशी योग्य व्याख्या देता येईल.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

सुखवाद म्हणजे सुख हेच समाजाचे एकमेव ध्येय असले पाहिजे असा सांगणारा वाद होय.याचे दोन मुख्य प्रकार आहेतः

अहंकेद्रवाद आणि सार्वत्रिक सुखवाद.यातील सार्वत्रिक सुखवादास सुखवादाचा मुख्य प्रकार म्हणतात. त्यालाच ***उपयुक्ततावाद*** म्हणतात.

- अहंक्रेंद्रवाद / स्वः सुखवाद
- सार्वत्रिक सुखवाद

याचे स्वरुप अनुक्रमे पुढीलप्रमाणे :



### (1) अहंकेंद्रवाद :


व्यक्तीने केवळ स्वतःकरीताच जास्तीत जास्त सुख मिळवावे , असे हा सिध्दान्त सांगतो. '' माझे सुख हेच माझे परम कर्तव्य आहे, तेच माझे प्राप्तव्य आहे '' असे हा सुखवाद सांगतो.म्हणून त्यास '**अहंकेंद्रवाद**' असे म्हटले आहे.हा सिद्धांत पुढीलप्रमाणे युक्तिवाद मांडतो :

''व्यक्तिने स्वसुखालाच महत्व देण्यालाच नैतिक महत्व आहे, असे समजणे हा ***अहं*** आहे.एकदा 'स्वतःच्या सुखाला महत्व दिले पाहिजे हे मान्य झाले तर प्रत्येक जण तशी कृती करेल.प्रत्येकजण सुखाकडे जाईल.म्हणजेच सर्वजण सुखी होतील.व्यक्तिचे सुख म्हणजे समाजाचे सुख।'', असे समीकरण हा सुखवाद मांडतो.

जर स्वतःच्या सुखाकडे दुर्लक्ष करुन इतरांच्या दुःखाकडे लक्ष देत राहिल्यावर कोणीही सुखी होवू शकत नाही. परिणामी एकूण सुख निर्मितीचे प्रमाण अतिशय कमी राहिले आहे. प्रत्येकाने आपल्या सुखासाठी प्रयत्न करावे. हा सुखवाद प्रथम एपिक्युरस,थॉमस हॉब्ज (1588-1679), नीत्शे आणि जोसेफ बटलरने (1692 ते 1752 ) मांडला .

''माझे सुख हेच समाजाचे सुख. समाजाच्या कल्याणासाठी मी माझेच कल्याण करावे '' हे तर्कशास्त्र अतिशय चमत्कारीक आहे .कारण हा सुखवाद न होता स्वार्थवाद होतो.प्रत्येकजण स्वार्थी झाला तर एकूण सामाजिक सुखाची निर्मिती होणार नाही, या आक्षेपावर बटलर म्हणतो, ''सुखवाद म्हणजे स्वतःचे सुख ,स्वतः बद्दलचे प्रेम'' हा केवळ शब्दार्थ आहे.

**Thomas Hobbes**
(5 April 1588 – 4 December 1679),
an English philosopher,
Famous for *Leviathan* (1651)
established the foundation for
most of Western political philosophy




**Joseph Butler**
(18 May 1692 – 16 June 1752)
an English bishop,
theologian, apologist,
and philosopher



Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

**Friedrich Wilhem Nietzsche**
(October 15, 1844 – August 25, 1900) German philosopher, poet, Composer and classical philologist.
Famous for his idea about "death of God."



सामान्य माणसे समजतात तसा स्वार्थ या सुखवादात नाहीच. उलट प्रामाणिकपणा व निस्वार्थ हे धोरण अहंकेंद्रवादात अपेक्षित आहे. प्रत्येक व्यक्ती जर खरोखरच स्वतःच्या सुखाच्या निर्मितीत गुंतली तर सर्व समाज सुखी होईल ते कसे होईल पुढीलप्रमाणे :

"मी" असे म्हणताना व्यक्तीने केवळ "मी स्वतः एकटी व्यक्ती" असे न म्हणता या "मीपणात माझे कुटुंबीय, मित्र यांचा समावेश केला पाहिजे.त्या सर्वांचे सुख म्हणजे माझे सुख असे म्हटले पाहिजे.मग साहजिकच मी माझ्या बरोबर त्याच्याही सुखाची काळजी करेन." अशारितीने " माझे पणाची " व्याप्ती वाढविणे ,ही अहंमकेंद्रवादाची अट आहे. ती अट पाळणे ही नैतिक जबाबदारी आहे. आणि त्यावेळी सर्व मानव समाज हेच माझे कुटुंब होईल तेव्हा मी सर्व समाजासाठी सुख मिळवीन कोणालाही दुःख देणार नाही.

वरील कारणांमुळे अहंकेंद्रवाद नैतिकदृष्टया योग्य आहे.हे व्यक्तिगत धोरण नव्हे.सिध्दांत सर्व काळातील सर्व समाजासाठी असतात. म्हणून अहंकेंद्रवाद हा स्वार्थ नाही तर सार्वजनिक स्वरुपाचे निस्वार्थी सामाजिक धोरण आहे, असे बटलर म्हणतो.

## मिलचा सार्वत्रिक सुखवाद :

जे.एस .मिल म्हणजे जेरेमी बेथँम या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञाचा मित्र जेम्स मिलचा मुलगा. जे.एस .मिल बेथँमचा विद्यार्थी. 1826 मध्ये त्याचा जन्म लंडन शहरात झाला.

**John Stuart Mill**
(20 May 1806 – 8 May 1873)
A British philosopher, political economist and civil servant. Called as "The most influential English-speaking philosopher of the nineteenth century"



केवळ तिसऱ्या वर्षी त्याला ग्रीक भाषा उत्कृष्टपणे लिहीता वाचता येत होती.चौथ्या वर्षी त्याला लॅटीन अवगत झाली.सातव्या वर्षी प्लेटोचे संपूर्ण तत्त्वज्ञान त्याला पाठ होते.जगातील वादग्रस्त आणि जगाच्या इतिहासावरच विलक्षण परिणाम करणारा 'उपयुक्ततावाद ' हा सिध्दांत मिल्लने केवळ 15 व्या वर्षी मांडला.20 व्या वर्षी Systems of Logic या नावाचा सहा हजार पानांचा ग्रथ त्याने लिहीला.1873 साली हॅबीनॉन या छोटयाशा खेडयात त्याचा मृत्यू झाला. तो कोठेही तर्कशास्त्राचा अथवा तत्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून कामाला नव्हता.हे मिलचे थेडक्यात चरीत्र. त्याचा सिध्दात पुढीलप्रमाणे.

मिलने आपल्या सुखवादास '**उपयुक्ततावाद**' असे नाव दिले. प्रत्येक व्यक्तीला सुखच हवे असते.हा त्याचा सिध्दांत आहे हा सिध्दांत दोन गृहीत तत्वांवर आधारलेला आहे ती अशीः

Department of Philosophy Sangamner College Sangamner

1. प्रत्येक माणसाला फक्त सुखच हवे असते.
2. माणूस ज्याची इच्छा करतो त्याचीच तो इच्छा करतो आणि तो ज्याची इच्छा करतो , असे जे आहे ते केवळ सुखच असते.

सुखाची व्याख्या मिल्ल पुढीलप्रमाणे करतो :

जो जे इच्छितो ते त्याचे सुख.
इच्छा कशाची करावी ?
सुखाची ?
सुख म्हणजे काय ?
माणूस ज्याची इच्छा करतो ते !



मिलचा हा युक्तीवाद नवीन काहीच सांगत नाही. तेच तेच सांगतो .शिवाय ही व्याख्या दोषपूर्ण आहे. जे सिध्द करावयाचे तेच तो गृहीत धरतो.आता हे खरे की मनुष्य ज्याची इच्छा करते ते प्राप्त झाले की त्यास प्राप्तीचे सुख मिळते . पण हे खरे सुखाचे कारण नसते .कारण सुखाचा विचार करण्यापूर्वी आणि सुख मिळाल्यानंतर आपणास खरे सुख मिळाले आहे का ? असा प्रश्न निर्माण होतो. उदा. भुकेली व्यक्ती अन्नाची इच्छा का करतो ? अन्न प्राप्तीचे सुख अनुभवतो पण येथे होणाऱ्या सुखाचे कारण प्राप्त झालेले अन्न हे असते का ? सुख मिळवायचे म्हणून व्यक्ती जेवते ती नसते तर जेवायचे असते म्हणून व्यक्ती जेवते. ती गरज असते पण माणूस अन्न सुखाच्या प्राप्तीसाठी जेवतो असा निष्कर्ष मिल काढतो. कारण त्यांचा सिध्दांत सांगतो की, माणसाला सुखच हवे असते. अन्न सुख देते पण सुख हे काही अन्नाचे सुख नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जे हवे असते ते सुख आणि सुख म्हणजे जे हवे असते ते हा एक चक्रव्यूह आहे . मिल त्यात अडकलाच पण त्याचे अनुयायी सुध्दा फसले. तो चांगले व सुख एकत्र करतो.

सुख चांगले असते
पण चांगले म्हणजे काय ?
चांगले म्हणजे सुख.

किंवा

जे चांगले असते तेच सखदायी असते.
म्हणून माणूस सुखाची इच्छा करतो.
माणूस ज्याची इच्छा करतो ते सुख.

पण इथे नैतिक पेच असा आहे की " सुखाची इच्छा चांगली असते " . या विधानात सुख आणि इच्छा अशा दोन स्वतंत्र संकल्पना आहेत.मिल त्या एकच समजतो. बरे , आता , रहस्यमयता अशी आहे की, सुख हे नेहमी हितकारकच असते नाही ! उदा. आजारपणात खाव्या लागणाऱ्या गोळ्या, औषधे कडु असतात. इंजेक्शनमुळे बोचते - सुजते. आता या काही सुखसंवेदना नव्हेत. तापात चव कडू लागते. काहीतरी वेगळे खावे म्हणून तेलकट तुपकट खाल्ले तर सुख मिळते.पण ते हीतकारक असते का ? याचा अर्थ 'सुख म्हणजे हित ' असा नाही. आणि जे हितकारक आहे ते सुखकारक असतेच असे नाही. आणि नीतिशास्त्र तर हिताची काळजी करते म्हणून सुख ही ही काही नीतिशास्त्रीय संकल्पना होऊ शकत नाही.

Department Of Philosophy, Sangamner College , Sangamner

मग असे असेल तर 'प्रत्येकाला सुखच हवे असते' या मिलच्या म्हणण्याचा काय अर्थ उरला ? अहितकारक असेल तर आपण खरेच सुखाच्या मागे धावतो का ? शिवाय सर्वांना सुखच हवे असते असे नाही. तुकाराम विठ्ठलाकडे दुःख मागतो इ. सर्व इच्छा सुखाच्याच असतात. असे कसे समजावयाचे ? अपवाद करायचा तर मग नियम कशाला करायचा ? असे दिसते की, मिल त्याच्या सिध्दांताचा आधारे एक वेगळेच नीतिशास्त्र मांडतो आहे. त्यांच्यामते ' माणसे सुखाचीच इच्छा करतात ' ही सरळ दिसणारी गोष्ट आहे. त्याला पुरावा कशाला हवा ? पण नीतिशास्त्र सांगते की, सुख ही नीतिशास्त्रीय संकल्पना होणे कठीण आहे.
म्हणून मिलच्या सुखवादाव आक्षेप घेता येतील. ते असे,

## सुखवादावर आक्षेप

1) पहिला आक्षेप असा की एखादया गोष्टीची इच्छा केली जाते म्हणून तिची इच्छा करणे योग्य आहे असे सिध्द होत नसते. कशाची इच्छा करणे योग्य आहे ? हा नीतिशास्त्रीय प्रश्न आहे.दुःखाचीही इच्छा करता येते .पण मिल माणसाने सुखाचीच इच्छा करावी , अशी जबरदस्ती करतो.

2) दुसरा आक्षेप असा की, एकदा सुख हेच चांगले असते,हे पक्के झाले की ''जितके जास्त सुख तितके जास्त चांगले '' असे म्हणता येते.पण व्यवहारात तसे दिसत नाही. वेगवेगळे तेलकट तूपकट पदार्थ तुडुंब खाऊन लोळत पडण्यापेक्षा एखादी व्यक्ती नाटकाला जाईल, वाचन करेल. काव्यरसापेक्षा ऊसाचा रस गोड असतो.आवडतो, सुख देतो म्हणून खूप खूप प्यावा तर नंतर जे घडेल त्याचे काय ?

मिलला या आक्षेपांची जाणीव होती. म्हणून तो सुखात प्रकार करु इच्छितो.

## सुखाचे प्रकार

मिल सुखाचे दोन प्रकार करतो. उच्च सुख व नीच सुख. या संदर्भात त्याचे ईक वचन प्रसिद्ध आहे. तो म्हणतो ''सुखी डुकरापेक्षा दुःखी सॉक्रेटीस बरा''. माणूस व डुक्कर यातील फरक मिल मान्य करतो. तसाच फरक तो सुखातही करु इच्छितो पण सुख ही भावना असल्याने भावनेचे प्रकार करता येत नसतात.हाही आक्षेप लक्षात घेऊन मिल त्याचा युक्तीवाद सुधारीत स्वरुपात पुढीलप्रमाणे मांडतो.

सुख हेच मानवाचे उद्दिष्ट असते.
सुख उपयुक्त वाटते.
जे उपयुक्त असते माणूस त्याचीच इच्छा करतो.
सुखाची इच्छा उपयुक्त आहे.
म्हणूनच सुख उपयुक्त असते.

अशा रितीने सुखाविषयी तो उपयुक्तता वाद मांडतो. सुख उपयुक्त भावना आहे. असा तो दावा करतो. म्हणून त्याच्या सुख वादास ''**उपयुक्ततावाद**'' असे म्हणतात. प्रत्येकाला म्हणजेच सर्वांना सुख हवे असते.असा दावा त्यात आहे. म्हणून त्यास ''**सार्वत्रिक सुखवाद**'' असेही म्हटले आहे.

## ब) कर्तव्यवादी सिध्दान्त :

## काण्टचा कर्तव्यवादी सिद्धान्त (निरुपाधिक आदेश )

**प्रस्तावना :**

आपण प्राप्तव्यवादी नैतिक सिध्दांताचा अभ्यास केला.सुख हे प्राप्तव्य व हितकारक असते, असा दावा ते करतात. सुख हवे असते, माणूस सुखाची इच्छा करते असे प्राप्तव्यवादी सिध्दांत सांगतो. आता व्यक्तीचे कर्तव्य किंवा समाजाचे कर्तव्य काय असावे हाही एक महत्वाचा प्रश्न आहे. कर्तव्य म्हणजे काय ? ते कसे करावे ?

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

आणि का करावे ? याविषयी इमॅन्युएल कांट याचे चिंतन महत्वाचे आहे. कांट कर्तव्यावर भर देतो आणि कर्तव्यवादी नीतिशास्त्राचे मांडणी करतो.

कांट हा पाश्चात्य तत्वज्ञानामधील अत्यंत महत्वाचा तत्वज्ञ आहे. त्यास '**तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी** ' असे म्हटले आहे. कांटचा अभ्यास केल्याशिवाय कोणत्याही विषयाचा अभ्यास होऊ शकत नाही, इतके कांटचे चिंतन व्यापक व मूलभूत आहे.त्याचा जन्म जर्मनीतील कोनिग्जबर्ग या छोटयाशा शहरात 1724 साली झाला व तेथेच 1804 ला त्याचा मृत्यू झाला.

**Immanuel Kant**

(22 April 1724 – 12 February 804)
A German philosopher
from Königsberg
(Today Kaliningrad
Of Russia)



कांन्टने अध्यात्म, ईश्वर,निसर्ग,समाज या सर्व क्षेत्रात अतिशय आश्चर्यकारक संशोधन,लेखन केले. अत्यंत शिस्तप्रिय जीवन जगणारा कांट त्याच्या आयुष्यात गावाबाहेर फक्त एकदाच गेला होता. कांट इतका शिस्तप्रिय होता की त्याच्या फिरण्याच्या वेळांनुसार लोक आपले घड्याळ लावीत असत.

**पार्श्वभूमि :**

कान्टच्या काळात युरोपातील तत्वज्ञान व विज्ञान यात प्रचंड गोंधळ होता. कान्टने हा गोंधळ मिटविला. ज्ञानाचा खरा मार्ग एकतर बुद्धि आहे किंवा अनुभव आहे, अशी दोन टोके अतिरेकीपणे मांडली जात होती. त्यांच्यात त्याने समन्वय केला.त्याच्या मते आपले ज्ञान अनुभवातून सुरु होते आणि बुद्धित संपते .या बुद्धिला कान्ट '**विवेकशक्ती**' (Reason) असे नाव देतो. तो समन्वय करतो. म्हणून त्यास 'समन्वयी तत्वज्ञ ' असे म्हणतात. आणि बुध्दीला विवेकाला महत्व देतो म्हणून त्याच्या तत्वज्ञानास '**विवेकवाद**' असे म्हणतात.

कान्टच्या मते निसर्ग व विविध सामाजिक विषयांचे ज्ञान अनुभवाने होते तर गणित, भूमिती,सौंदर्य कला यांचे ज्ञान विवेकाने होते . सर्वच अनुभव प्राप्त ज्ञान निश्चित असतेच असे नाही तर विवेकाने प्राप्त झालेले ज्ञान निश्चित आणि सत्य आणि स्थल-काल-व्यक्ती निरपेक्ष असते. ही ज्ञान क्षेत्रातील त्याची विवेकवादी भूमिकेची मांडणी तो नीतिशास्त्राच्या क्षेत्रातही करतो.त्यात तो कर्तव्याला अतिशय महत्व देतो म्हणून त्याच्या नीतिशास्त्रास 'कर्तव्यवादी नीतिशास्त्र ' असे म्हटले आहे. त्याच्या नैतिक सिध्दांताचे स्वरुप तीन घटकात सांगता येते :

**अ) सत् संकल्प**
**ब) कर्तव्य**
**क) निरुपाधिक आदेश**

काण्टला समजा, आपण असे विचारले की ''सुख म्हणजे काय ? '' तर त्याचे उत्तर इतरांपेक्षा वेगळे असेल. साधारणतः' सुख प्रत्येकाला प्रिय असते, म्हणून चांगले असते ' असा एक ढोबळ निष्कर्ष काढला जातो. कान्ट असा प्रश्न विचारतो की सुखाची इच्छा नैतिक असते का ? खरोखरच सुख चांगले असते का ? सुखाचा चांगुलपणा नेमका कशावर अवलंबून आहे . कारण समजा उदा. तिकिट न काढता प्रवास करणे , खाऊन पिऊन कँटीन वाल्याची नजर चुकवून पसार होणे, दरोडे घालणे हा सगळी कृत्य सुखदायी असतात. पण अनैतिक

Department Of Philosophy Sangamner College

असतात म्हणून सुख नेहमीच चांगले असते असे नाही.चांगुलपणा विवेकाने ठरवावा लागतो. विवेकशक्ती आपणास गणिती ज्ञानासारखे स्थळकाल व्यक्ती निरपेक्ष सत्यज्ञान देते. तसे सुखाचे मूल्य नसते . चांगुलपणा हा विवेकनिष्ठ असेल तर सुख सुध्दा विवेकनिष्ठच असले पाहिजे.

कशावर तरी अवलंबून असलेले सुख हे सुख असतेच असे नाही. म्हणून ते ध्येय होऊ शकत नाही . माणसाचे खरे ध्येय स्थळ काळ व्यक्ती निरपेक्ष सुख हे असले पाहिजे.अशा ***निरुपाधिक आणि चांगल्या सुखाला 'शुभ सुख ' म्हणता येईल अशा सुखाची इच्छा ही खरी सुखाची इच्छा*** म्हणता येईल.म्हणून व्यक्तीने अशी सतत अशा निरपेक्ष सुखाची इच्छा करावी त्याला कान्ट 'सत् संकल्प ' असे म्हणतो. सत्संकल्पाने निरुपाधिक सुख मिळते . त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे-

## अ) सत संकल्प :

कान्ट त्याच्या ''नैतिक तत्त्वांची आधारभूमी'' ( *Groundwork of the Metaphysics of Morals 1785*) या ग्रंथात ही चर्चा करतो.त्याच्या मते व्यक्तीने 'कर्तव्य करणे' हाच सत्संकल्प आहे.सत संकल्प हाच खरा संकल्प आहे.त्याशिवाय दुसरी कोणतीह गोष्ट विनाअट चांगली असू शकत नाही.तो म्हणतो "There is nothing it is possible to think of anywhere in the world, or indeed anything at all outside it, that can be held to be good without limitation, excepting only a **good will"** (Ak 4:393) बुध्दीमत्ता, शक्ती, संपत्ती, किर्ती,रुप,यौवन अशा अनेक गोष्टी चांगल्या आहेत खऱ्या.पण त्या कशावर तरी नेहमी अवलंबून असतात. सत्संकल्प असा कशावर तरी अथवा कशावरही अवलबूंन नसतो.तो निरुपाधिक (unconditional ) असतो.सत्संकल्पाचे स्वरुप समजण्यासाठी कांट इच्छा आणि संकल्प यात फरक करतो.

## इच्छा आणि संकल्पः

इच्छा ही शाब्दिक , मानसिक असते तर संकल्पाला कृतीची जोड असते. ''प्रत्येकजण सुखी व्हा, मोठे व्हा , शहाण्यासारखे वागा, सर्वत्र सुखिनः सन्तु '' हे आशिर्वाद संकल्प नसतात.केवळ इच्छा असतात. निरर्थक असतात.त्यांना कृतीची जोड दिली तरच त्या इच्छेचे रुपांतर संकल्पात होते.इच्छा सफल होण्यासाठी जे जे करावे लागेल आणि जे जे करणे शक्य आहे ते ते सर्व करण्याची मनापासूनची तयारी असणे , नंतर प्रत्यक्ष कृती करणे म्हणजे संकल्प .उदा. हिमालय पहावा किंवा निदान कळसूवाईचा डोंगर पहावा, ही इच्छा आणि प्रत्यक्ष ती निर्माण करणे डोंगर चढणे हिंडणे हा संकल्प होय.

थोडक्यात प्रत्यक्ष कृतीशिवाय केवळ शाब्दीक पातळीवर व्यक्त केली जाते ती इच्छा आणि त्या इच्छेला प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन ती साक्षात सिध्द करणे म्हणजेच संकल्प. (इच्छा + कृती = संकल्प ) हे झाले संकल्पाचे स्वरुप.

आता एखादा संकल्प शुभ संकल्प कसा होतो ? तर कांन्टच्या मते शुभत्व हा गुण संकल्पात येतो तेव्हा तो सत्संकल्प होतो. पण ते शुभत्व , चांगुलपणा हा कोणत्याही बाहेरच्या घटकावर अवलंबून असता कामा नये. चांगुलपणा हा त्या संकल्पाचा अंतर्भूत घटक असला पाहिजे. हे पहा, दया करुणा सहानुभुती प्रेम मानवता इ. प्रेरणांनी संकल्पयुक्त असावा ; असे कान्टला म्हणावयाचे नाही. या प्रेरणा अथवा संकल्प कधीही शुभ नसतात.या नैसर्गिक प्रवृत्ती मानसशास्त्रीय नियमांवर अवलंबून असतात, माझ्यावर नाही. मला एखाद्याविषयी करूणा वाटेल की नाही वाटणार. ती नाही वाटली तर कोणी माझ्यात ती निर्माण करू शकत नाही. त्यामुळे करूणा वाटून दयेपोटी भीक दिली जाते. पण भिकाऱ्यास भिक देणे हा शुभ संकल्प नाही.कारण भिकाऱ्याचा एकंदर अवतार पाहून किंवा कटकट नको म्हणून भिक दिली जाते.करुणा सगळ्यांना वाटेलच असे ही नसतेच.ही एक गोष्ट.

दुसरी असे की,त्यावेळेपुरता त्या भिकाऱ्याचा प्रश्न सुटेल. पण तो पुन्हा भिक मागेल त्याचे काय ? त्याला पुन्हा भिक मागावी लागते. त्याचे काय ? मुळात भिकारी असणे हे सुदढ निरोगी, समृध्द अर्थव्यवस्थेचे व

समाजाचे लक्षण असू शकत नाही. येथे प्रश्न असा आहे की, कुणालाही भीक मागावी लागणार नाही. प्रत्येकजण स्वाभिमानाने जगेल असा समृध्द समाज कसा निर्माण करता येईल ? त्या निर्मितीत माझा सहभाग कसा असेल ? हा मूलभूत शुभसंकल्पाकडे नेणारा प्रश्न आहे. तो सार्वत्रिक स्वरूपाचा आहे.

दया, करुणा, प्रेम या गोष्टीचे सुख सुध्दा सापेक्ष असते. कोणत्या तरी अटींवर , उपाधीवर अवलंबून असतात. त्या त्या व्यक्तीपुरते मर्यादित असतात. कशावर तरी अवलंबून असणे , ही संकल्पाची शुभ होण्याची अट नसते. श्राध्द करणे, वाढदिवस करणे, आईवडिलांच्या नावाने देणगी देणे हे चांगले संकल्प नाहीत, शुंभ संकल्प नाहीत. ते उपाधीयुक्त आहेत.त्यामुळे ते मर्यादित होतात.सापेक्ष होतात. ती अट पूर्ण होणार नसेल तर तो संकल्प ही वास्तवात येत नाही.तो नष्ट होतो.

मग कोणता संकल्प शुभ ठरतो ?

त्याचे उत्तर कान्ट पुढीलप्रमाणे देतो :

ज्ञान हे जसे स्थल, काल व्यक्तीसापेक्ष निरपेक्ष सत्य असते , तशी चांगुलपणाची प्रेरणा सुध्दा स्थल काल व्यक्ती निरपेक्ष चांगली असली पाहिजे.आणि जगात अशी प्रेरणा एकच आहे, ती म्हणजे कर्तव्य ! थोडक्यात एखादा संकल्प शुभ होण्यासाठी एकमेव अट म्हणजे तो संकल्प पुरा करणे हे माझे कर्तव्य असले पाहिजे. मग कर्तव्याचे स्वरुप काय ? तर ते पुढीलप्रमाणे.

## ब) कर्तव्य :

संकल्प चांगला होण्यासाठी, शुभ होण्यासाठी अनिवार्य असणारी अट म्हणजे प्रत्यक्ष कृती किंवा कर्तव्य या संकल्पनेचे दोन घटक आहेत.

(1) कृतीची भावना / प्रेरणा

(2) त्यानुसार प्रत्यक्ष केलेली कृती.

आता ,''नुसतेच जगाचे चांगले व्हावे '' असे म्हणून चालत नाही. त्यानुसार आपण स्वतः काय करतो ? हे महत्वाचे असते. नुसते संकल्प चालणार नाही तर थेट कृतीही केली पाहिजे. तरच तिला कर्तव्य म्हणता येईल. अशा रितीने कृतीची प्रेरणा हे तिचे पहिले वैशिष्टये असते. आणि कर्तव्याचे दुसरे वेशिष्टये म्हणजे प्रत्यक्ष कृती. या दोन्ही गोष्टी जुळल्या तरच तो संकल्प कर्तव्य संकल्प म्हणून ओळखला जातो आणि त्यालाच शुभ संकल्प म्हणतात.

कर्तव्य का करावे ? कारण ते कर्तव्य करणे हे माझे कर्तव्य आहे म्हणून.

कर्तव्यासाठी कर्तव्य केले पाहिजे तरच तो संकल्प होय.

एकदा जर कर्तव्यासाठी कर्तव्य करावयाचे ठरविले की, मग ''मी कर्तव्य का करु ? माझ्या ठिकाणी कर्तव्यबुध्दी नाही, मी काय करू ? '' असे कोणालाच म्हणता येत नाही.म्हणून कर्तव्य करणे , हेच माझे कर्तव्य बनते.'कर्तव्यासाठी कर्तव्य ' या एकाच भावनेतून जो संकल्प प्रेरित होतो तोच सत्संकल्प होय.कर्तव्य कशासाठी करावयाचे ? असा प्रश्न विचारणे हास्यास्पद असते. कर्तव्य करावयाचे असते म्हणून करावयाचे असते.ते माझे कर्तव्य असते ! प्रत्येकजण आपापले कर्तव्य करत असतो. विद्यार्थी , शिक्षक , राजकारणी ,समाजकारणी , भाऊ ,बहीण, मित्र इ. प्रत्येक व्यक्ती प्रत्येकवेळी कोणत्यातरी कर्तव्याला बांधिल असतातच.

## क ) काण्टचा तीन आदेशांचा सिध्दांत :

कांन्टच्या मते शुभ संकल्पांचे स्वरुप ' कृतीची प्रेरणा अधिक प्रत्यक्ष कृती ' अशा दोन संकल्पांची असते. त्यालाच तो कर्तव्य असे म्हणतो.ती निरपेक्ष असते.याचा अर्थ ही कर्तव्यबुध्दी निरुपाधिक असते. कशावरही अवलंबून नसते. काहीतरी मिळवायचे म्हणून कर्तव्य करावयाचे नसते तर कर्तव्यासाठी कर्तव्य

Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

करावयाचे असते . तोच सत्संकल्प होय.पण अमुक एक कृती ही कर्तव्य आहे , हे ठरवावयाचे कसे ? हा प्रश्न येतो.

तुमचा संकल्प सत् संकल्प असला पाहिजे, हे खरे. ''कर्तव्य करा '' किंवा विशिष्ट कृती हे तुमचे कर्तव्य आहे, असे कोण सांगतो ? हा प्रश्न सोडविण्यासाठी काण्टला 'नैतिक आचरणाचे परमतत्त्व ' (The Supreme Priniciple of Morality ) शोधून काढावयाचे होते.ते तत्त्व असे मांडतो.'' केव्हाही काहीही झाले तरी अशी कृती कर की त्या कृती मागील तत्त्वे हा सार्वत्रिक नियम व्हावा अशी इच्छा तू करु शकशील '' या आदेशाला ' **निरुपाधिक आदेश** ' (Categorical Imperative) म्हणतात.या आदेशाचीच तो सविस्तर मांडणी करतो. ती करण्यासाठी तो सांगतो की 'कर्तव्य कर ' असे बाहेरची कोणी व्यक्ती सांगत नाही .तसे सांगितले तर ते कर्तव्य उरत नाही.कसे ? हे स्पष्ट करण्यासाठी तो आदेशाचे तीन प्रकार सांगतो :



### 1.**सोपाधिक आदेश** (hypothetical imperative):

एखादे उद्दिष्टय साध्य किंवा स्वार्थ साधण्यासाठी जो आदेश दिला जातो, तो सोपाधिक आदेश. चांगला अभ्यास करा, ते कर्तव्य आहे या आदेशामागे परीक्षेत सुयश हे साध्य असते. पहाटे फिरायला जा, प्रकृती नीट राखा, या आदेशामागे आरोग्य सुधारणे हे उद्दिष्ट असते. चांगला स्वयंपाक शिक चांगला नवरा मिळेल ही सगळी कर्तव्य ही सोपाधीक कर्तव्य असतात त्याचे नैतिक मूल्य शून्य असते.

### 2.**निश्चितार्थक आदेश** (Assertorocal imperative )

या आदेशात उद्दिष्ट असते.पण ' जर .. तर.. 'ची अट नसते.म्हणजे येथे आदेशाची आवश्यकता आणि बंधकता नसते. उदाहरणार्थ ' सुख हे उद्दिष्ट असते.पण म्हणून सुख मिळव ' असा आदेश दिलाही जातो. सुखवाद तेच सांगतो. लोक कृतीही करतात.पण सुख मिळवच, असे म्हणू शकत नाही, कारण काहीजणांना ते नको ही असू शकते. उलट नैतिक आदेशात मात्र बंधकता, अनिवार्यता असते.कारण त्यात उद्दिष्ट नसते. असा आदेश म्हणजे काण्टच्या मते ' कर्तव्य कर ' आणि तो विवेककुध्दी देते.त्यासाठी तो तिसरा प्रकार मांडतो.

### 3.**निरुपाधिक आदेश** (Categorical imperative)

हा आदेश म्हणजेच "Act only according to that maxim whereby you can, at the same time, will that it should become a universal law"[2] हाच सिध्दान्त म्हणजे ' निरुपाधिक आदेशाचा सिध्दान्त ' होय. या सिध्दान्ताची अधिक माहिती घेवू.त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

## काण्टचा निरुपाधिक आदेशाचा सिध्दांत :

**(1) आचरणाचा नियम**

'' केव्हाही काहीही झाले तरी अशी कृती कर की त्या कृती मागील तत्त्वे हा सार्वत्रिक नियम व्हावा अशी इच्छा तू करु शकशील ''

"Act only according to that maxim whereby you can at the same time will that it should become a universal law without contradiction. "

[2] Kant, Immanuel; translated by James W. Ellington [1785] (1993). *Grounding for the Metaphysics of Morals 3rd ed.*. Hackett. pp. 30. ISBN 0-87220-166-X.



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

हा नियम खरा तर मूलभूत "**Always act on that maxim which you can wish at the same time to be a Law universal** " या आदेशाचेच एक रूपांतर आहे.त्याच्या मते संकल्पाचे स्वरूप असे असावे की कृतीचा नियम हा सार्वत्रिक , सार्वजनिक व्हावा.कान्टच्या मते कृती करतांना, कर्तव्य बजावतांना त्यामागील तत्व हा केवळ स्वतःलाच लागू असता कामा नये .ते सर्वांना लागू होईल असे व्यापक व आदर्श असले पाहिजे. उदा. दिलेले वचन पाळावे हे तत्व '' मला इतरांनी दिलेले वचन त्यांनी पाळावे '' असे असू नये ; तर '' प्रत्येकाने दिलेले वचन पाळावे '' असे सार्वत्रिक स्वरुपाचे असावे. तरच तो आचरणाचा नियम होईल. वचन पाळा हा कर्तव्यात्मक आदेश विवेकबुध्दी विना अट देते म्हणून कान्ट या आदेशाला ***निरुपाधिक आदेश*** असे म्हणतो. त्यासच तो ''**नीतीचे परम तत्व** '' असेही नाव देतो.

## (2) निसर्ग नियमाचे तत्व :

'' अशा रितीने कृती कर की तुझ्या कृतीमागील तत्त्व जणू काही तुझ्या संकल्पामुळे निसर्ग नियम बनणार आहे . ''

"Act as if the maxim of your action will become through your wish a Natural Law"

पहिला आचरणाचा नियम इतक्या काटेकोरपणे अमलात आणावा की जणू काही तो निसर्ग नियमच बनावा ! कारण निसर्ग नियम अपरिवर्तनीय आणि अनुल्लंघनीय असतो.तसा कर्तव्याचा नियम असावा. काण्टच्या मते व्यक्तीचे वर्तन अशा तऱ्हेचे आचरण असावे की त्याचा आदर्श सर्व काळातील सर्व देशातील लोकांनी जणू काही निसर्ग नियम स्वीकारावा , तसा विनाअट स्वीकारावा. ' कर्तव्य कर ' हा विवेकबुध्दीने दिलेला आदेश असा निसर्ग नियम बनला तरच तो सतसंकल्प होवू शकतो, अन्यथा नाही.

## (3) साध्यमूल्यत्व

''कोणत्याही माणसाला , मग ती स्वतः असो किंवा इतर कुणीही , केवळ साधन म्हणून न वागविता तो माणूस एक साध्य आहे असे वागविले पाहिजे ''

" Treat humans whether in the their own person or in the person of somebody else always as the end and never mearly as means "

प्रत्येक माणूस हा आपले साध्य असला पाहिजे, तो साधन असता कामा नये. त्यास साधन समजू नये. जर ''मी इतरांना साधन समजलो तर इतर लोकही मला तसेच साधन समजूनच वागवतील. त्यामुळे त्यांनी मला साध्य समजावे , असे मला वाटत असेल तर मीही त्यांना साध्यच मानले पाहिजे , साधन नाही '' काण्टच्या मते , माझी स्वतःची कृती व इतरांची कृती याकडे आपण भिन्न नजरेने न पाहाता व्यापक दृष्टिने पाहिले पाहिजे. मी जितका महत्वाचा आहे, असे मला वाटते तितकेच इतरजनही मला तितकेच महत्वाचे वाटले पाहिजेत तरच मी ही इतरजनांना महत्वाचा वाटेन, अन्यथा नाही. कारण हा नियम सार्वत्रिक स्वरूपाचा असतो.

## (4) साध्य मूल्यांचे सुव्यवस्थित जग :

'' साध्य मुल्याच्या एका सुव्यवस्थित जगाचा एक घटक समजून प्रत्येक व्यक्तीने आचरण करावे.''

" Always act as a member of Kingdom Of Ends "

कान्टच्या मते वरील तीन आदेश पाळले तर जे जग निर्माण होईल ते साध्य मूल्यांचे जग होय.'' मी साध्य असेल इतर जनही साध्य असलील. '' असे सांगणारा हा स्वतंत्र नीतितत्त्वच आहे. परिपूर्ण नैतिक जगात संघर्ष नसतो.याचे कारण मी कुणालाही साधन मानीत नाही आणि मलाही कुणी साधन मानीत नाही.त्यामुळे

Department Of Philosophy Sangamner College, Sangamner

माझ्यावर कुणी बंधन घालीत नाही अन् मी ही प्रतिकार म्हणून त्या व्यक्तीवर बंधने लादत नाही.अशा जगाची रचना ही साहजिकच सुव्यवस्थित असते. ते साध्यमूल्याचे राज्य असते.

**(5) निरुपाधिक चांगलेपणा वा संपूर्ण कल्याण**

हे चार आदेश साध्यमूल्यांचें जग निर्माण करणारे आहे. ते जर निर्माण झाले तर कर्तव्य करणारी व्यक्ती त्या जगाची नागरीक होते प्रत्येकजण अशी नागरीक झाली तर जगात केवळ सत्संकल्प असेल.प्रत्येकजण चांगले वागेल प्रत्येकाचे कल्याण प्रत्येकजण साधेल मी माझे कर्तव्य केले आता तू तुझे कर्तव्य कर असे कुणीही कुणाला सांगणार नाही कारण प्रत्येकजण आपापले कर्तव्य करीत राहील.अशा जगात सर्वजण सुखीही असतील.

साधारणत; असे घडते की कोणतेही सुख कोणत्यातरी अटी पाळल्या तरच मिळते.त्यामुळे सत्संकल्पाशी सुसंगल असेल तर सुख चांगले असते.दुर्जनाला सुख मिळाले तर ते चांगले नसते.ती भयानक गोष्ट होईल.सुख सज्जनाला मिळावे असे वाटत असेल तर तो सत्संकल्पाशीच जोडला गेला पाहिजे.सद्गुण आणि सुखी जीवन हेच खरे कल्याण असते. नीती माणसाला हवी असते ती सुखी होण्यासाठी नव्हे तर सद्गुणी होण्यासाठी असे काण्टला म्हणतो. थोडक्यात सोपाधिक आदेश व निरुपाधिक आदेश असे कर्तव्याचे मुख्य दोन प्रकार आहेत. पण सोपाधिक आदेश हे कर्तव्य नव्हे. खरे कर्तव्य निरुपाधिक आदेशाच्या स्वरुपात असते. ते आदेश विवेकबुध्दी देते. आणि ती ***प्रत्येकाजवळ*** असते.

--------------------------------------------



Department Of Philosophy, Sangamner College Sangamner